"श्री त्र्यंबकेश्वर प्रसन्न"

श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर मूलगोदावरीचे अधिकृत उपाध्याय

भ्रमणदुरध्वनी = ०९४२२२६८५९६ **भूषण सांभ शिखरे***(ज्योतिष पंडित)*

**निनाद भूषण शिखरे**

**ग्रहसंकेत ज्योतिष कार्यालय***(कृष्णमूर्ती सिध्दांतावर आधारित)***संतती व विवाह ह्यांचे विशेषतज्ञ**

**पत्ता =४१७,"ग्रहसंकेत",सत्यनारायण मंदिराजवळ, मेनरोड,मु.पो.ता.श्रीक्षेत्र त्र्यंबकेश्वर.जि.नाशिक ४२२२१२ महाराष्ट्र**

---

**(०२५९४) २३३०१४ फोनची वेळा दुपारी २ ते ५ व रात्रौ ८ ते १० फक्त, भेटण्याची वेळ दुपारी २ ते ५ फक्त**

---

**www.kalsarpyog.com & Email = bhushanshikhare@gmail.com & shikharebs@rediffmail.com**

---

**गुगलच्या अँण्ड्राईड प्ले वर ह्या दोन (kalsarpyog & pitrudosh) नावाने आम्ही आपल्या सेवेत उपल्बध आहोत.**

---

## ।। " नारायणबली " ।।

मृत्यनंतर आत्म्याचे अस्तित्व हे गृहित धरलेले असते.हिंदुधर्मात जन्माचे प्रकार ८४ लक्ष आहेत, असे मानतात. धर्म,अर्थ. काम,मोक्ष हे ४ पुरूषार्थ आहेत.जन्मानंतर मृत्यु.मृत्यु नंतर जन्म या संकल्पनेचा मानस हिंदुधर्मात अपेक्षित नसतो. मृत्युनंतर पुनर्जन्म ही इच्छा हा संकल्प न ठेवता मोक्षाची प्राप्ति अपेक्षित असते. म्हणजेच मृत जीवास सद्‌गती लाभावी व त्याचा पुढिल प्रवास सुरळित व्हावा असेच अपेक्षित असते.अन्नमय व प्राणमय कोश निकामी झाल्यावर अंत:करणासह म्हणजे मन,बुध्दि,अहंकार व चित्त या सर्वांसकट जीवात्मा बाहेर पडतो आणि कालांतराने नव्या गर्भात प्रवेश करतो,अश्या अनेक जन्म-मरणाच्या चक्रातुन कायमचा बाहेर पडतो व इतर सर्वकोशासह जेव्हा कारण देहही गळुन पडतो तोच मोक्षाचा क्षण ठरतो.

मृत्युसमयी एखाद्याचा शुभ वा अशुभ वासना अतितीव्र असतील तर त्या वासना मृत जीवात्मास स्वस्थ बसु देत नाही.त्यातुन त्याच्या मृत्यनंतरच्या प्रवासाला गती येते व दिशा मिळते.नेहमीच्या प्रक्रियेनुसार प्रथम प्राणकोष व वासनाकोष नंतर मन:कोष गळुन पडतात.वासना व मन साररूप कारणदेहात साठवीले जातात. त्यानंतर कारणदेहातील जीवात्मा पुढिल जन्मायोग्य परिस्थितीची वाट पहात बसतो.पण काही वेळेला याप्रक्रियेला वर्षोनवर्षे लागत असतात. जीवात्माच्या मृत्युसमयी वासना अतितीव्र असल्या तर पिश्शाच्चयोनीत प्रवेश करतो.या भूतयोनीत वा पिश्शाच्चयोनीत असतांन्ना कधी-कधी कुठल्याही तरी जीवित माणसाव्दारे तो वासना भोगत असतो. कालांतराने वासनामय जीवात्मा पिश्शाच्चयोनीत न जाता कधी-कधी पितृयोनीतच थांबुन रहातो व तेथुन तो आपल्या वंशजांच्या जीवनावर लक्ष ठेवत असतो आणी त्याच्या उत्कर्षापकर्षात स्वत:च्या वासना भोगतो. जीवात्माचे पितृलोकात वास्तव्य काही वर्षापुरतेच असते,त्यानंतर तो आपल्या पुढच्या प्रवासाला लागतो.

धर्मशास्त्रात ६६ प्रकारचे दुर्मरणाचे प्रकार सांगितले आहेत.मृत्युचे कारण आत्महत्या, खुन, अपघाती अकालीमृत्यु असेल तर अश्या व्यक्ति स्वसाधारणपणे पिश्शाच्चयोनीत प्रवेश करतात.यातील काही पिशाच्यांचे आपल्या तीव्र वासनेमुळे एखाद्याच्या मागे लागतात.आत्महत्या,खुन,अपघाती अकालीमृत्यु यामुळे एखाद्या व्यक्तिस मृत्यु आल्यास ती व्यक्ति तीचे मानवदेहातील नियत आयुष्य संपेपर्यंत पिश्श्याच्चयोनीत रहाते व अतृप्त आत्मांच्या मोक्षासाठी केला जाणारा विधी म्हणजेच नारायणबली होय आणि त्यांतर परलोकाचा प्रवास सुरू करते.

कुळातील या जन्मी किंवा जन्मांतरी पुरूष वा स्त्रिया ज्याकोणी अतृप्त असतील त्यांन्ना सद्‌गती मिळण्यासाठी हा विधी केला जातो.वासना अतृप्त राहिल्यामुळे पिश्शाच्चयोनीत असलेल्या वा प्रेतयोनीत असलेल्या तसेच वंशवृध्दिस प्रतिबंध करित असलेल्या शरिरास बाधा उत्पन्न करणा-या,कुलास उपद्रव करणा-या व मनोकामना पूर्ण होऊ न देणा-या अश्या सर्व अतृप्त आत्म्यांच्या शापापासुन मुक्ततेसाठीच हा नारायणबली विधी केला जातो.नारायणबली कर्मामुळे अतृप्त आत्म्यांन्ना मोक्ष मिळावा हीच मूळ संकल्पना आहे.नारायणबली कर्मामध्ये नारायण हे नाव अतृप्त आत्म्याच्या समुदायाचे नाव संबोधले जाते. या प्रत्यक्ष कर्मामध्ये विधीस

बसणा-यांचे गोत्र वा पितरांच्या नामोच्चार केलाच जात नाही.या विधीमुळे अतृप्त आत्म्यांन्ना पिश्श्याच्यदोषापासुन पितृदोषा पासुन मुक्ति मिळते व घरातील सांसारिक सुखाच्या माध्यमातुन नारायणबलीचे फळ अनुभवास येते. संततीत वृध्दि होणे, घरातील मुला-मुलीचे लग्नकार्य होणे,धन-द्रव्यात वाढ होणे, या सारख्या सर्व सुखांचा लाभ नारायणबली कर्मामुळे होतो.

## ।। " नागबली " ।।

**एतैत सर्पा: शिकंठ्भूषा लोकोपकाराय भुवं वहन्त:। भूतै समेता मणिभूषितांगा: गृण्हित पुजा परमा नमोव:।। कल्याणरूपं फणिराजमग्र्यं नानाफणा मंडलराजमानम:। भक्त्यैकगम्यं जनताशरण्यं यजाम्यहंन: स्वकुला भिवृध्यै।।**

सर्पदोषाच्या परिहारा करिता केला जाणारा विधी म्हणजे नागबली होय.सर्पदोष हा अनेक कारणांमुळे ओळखला जतो.त्यातील काही उदाहरणार्थ कारणे अशी आहेत. संतती नसणे,आरोग्य ठीक नसणे, विशेषत:, वात, कफ, पित्त, त्रिदोष-जन्य ज्वर, शूळ, उदररोग, गंडमाळ, कुष्ठ, कंडु, मुत्रकुच्छ, आदि रोगांमुळे सर्पबाधा आहे, असे मानले जाते. ८४ लक्ष जन्मामध्ये नाग हा एक जन्म आहे.सर्पयोनी व मानवाचा अतिनिकटचा संबंध आहे, महाभारतात तसा हा संबंध स्पष्ट दिसुनच येतो. ब्रम्हदेवापासुनच सप्तऋषी निर्माण झालेत,त्यातील एक मरीची ऋषींचा काश्यप मुलगा होता.त्यांस दोन पत्न्या होत्या.एकीचे नाव होते देवकन्या विनिता व दुसरीचे नाव होते दानवकन्या कद्रु.त्यांन्नाजी संतती होते विनितेला झाले गरूड कद्रुस झाले सर्प. असा मानवाचा व नागाचा निकटचा संबंध आहे,म्हणुनच शास्त्रिय दृष्ट्या दोघांच्याही उत्पत्तीशी साम्य आहे. योगशास्त्राप्रमाणे मानवी शरिरात असणा-या कुंडलीनीच्या जागृतीनेच देहाची साध्यता साध्य होते. या विषयाचे विश्लेषण आपल्या सर्वांचे अध्यात्मिक संत ज्ञानेश्वर माऊली यांच्या ज्ञानेश्वरीतही खुपच विस्ताराने खुलासा केलेलाच आहे.मूलाधार चक्रामध्ये पाठीच्या कण्यांच्या प्रारंभस्थानी कुंडलिनीच्या उत्थापनामुळे मानवाला ब्रम्हज्ञान प्राप्त होते,म्हणजेच जीवात्मास ऐक्य होते,असाही सिध्दांत आहे. मानवास मनुषत्व याच कुंडलीनीनेच प्राप्त होते.मानवाची वैज्ञानिक पूर्णता याच कुंडलीनीच्या ज्ञानानेच होते. अध्यात्मशास्त्रात त्याच कुंडलिनीस सर्प ही संज्ञा आहे वा मानलेली आहे. सर्प हत्या स्वत: याजन्मी किंवा पूर्व जन्मांतरी केलेली असल्यास,ज्ञात वा अज्ञातने सर्पवध केला असल्यास सर्पदोष निर्माण होतो,ह्यानेही सुसंतती निर्माण होण्यासही बाधा उत्पन्न होत असते.

**।। ''धनलोभात मृतायेच सर्पयोनी व्यवस्थिता "।।**

काही लोकांन्ना अंत्यसमयी सुध्दा धनलोभ असतो.काहींच्या घरात जमिनीमध्ये धन असते,त्या धनावर नाग बसलेला असतो,असे बरेच जुने जाणकार सांगत असतात वा ब-याच जुन्या घरांमध्ये पहावयास मिळते. धनावर बसलेला नाग हा मागिल जन्मी त्या संपत्तीचा मालक असतो,असे साधारण: मानले जाते.

**अनंतं वासुकिं शेषं पद्मनाभंच कंबलम्। शंखपाल धृतराष्ट्रं तक्षकं कालियं तथा।।**
**एतानी नव नामानी नागानांच महात्मना। सायंकाले पठेन्नित्यम् प्रात:काले विशेषत:।।**
**तस्मै विषभयं नास्ती सर्वत्र विजयी भवेत।।**

या स्तोत्रावरून असेही म्हणता येईल की,नाग हा विजय प्राप्त करवुन देणारा आहे.नागाच्या हत्येमुळे सर्पदोष निर्माण होतो. सर्पदोषाच्या मुक्ततेसाठीच नागबली विधीची प्रथा आहे.

## ।।" त्रिपिंडी श्राध्द "।।

**कलहोत्र नित्यम् हिमविनत्व दरिद्रता । दैन्यविपर्यय: श्रृति: सापिडा प्रेत संभव:।।१।।**
**राजचोराग्निद्दष्टैश्चहियते यध्दनंतरे । पापकर्मतंचित सापिडा प्रेत संभव:।।२।।**
**परस्त्रीषु परस्वेषु परद्रोहेषु येरता: । परवृत्तिंहिछेद्यती सापिडा प्रेत संभव:।।३।।**
**पुत्रद्वेष:,पितृद्वेष: तथा द्वेषस्तु बंधुषु । नानाजातिषु येद्वेष: सापिडा प्रेत संभव:।।४।।**
**एवम् नानाविधापीडा: प्रेता: कुर्वतिजंतंषु तेषां पीडा विनाशार्थे त्रिपिंडी श्राध्दमाचरेत्।।५।।**

अर्थात नित्यकलह, मलिनित्यम्, दरिद्रता, दैन्यम्, बोलण्याचा विपर्यास, राजभय, चोरभय, अग्निभय, द्दष्टभय, पापकर्मरति, परस्त्रीरति, परधनरति, परवृत्तिहरण, परद्रोहरति, पुत्रद्वेष, पितृद्वेष, बंधुद्वेष, नानाजाती द्वेष ह्या नानाविविध दोषाच्या परिहारार्थ त्रिपिंडी श्राध्द केले जाते.

त्रिपिंडी श्राध्द काम्य श्राध्द आहे. विशेष मनोकामना पूर्ण होण्याकरीता केला जाणारा श्राध्द म्हणजे त्रिपिंडी श्राध्द.शास्त्रोक्त रीतीने तीन वर्षापेक्षा जास्त कालावधी श्राध्द न केल्याने आपल्या पितरांन्ना प्रेतत्व प्राप्त होते. श्राध्द कमलाकर ह्या श्राध्दाच्या विशेष ग्रंथात आपल्या पितरांचे पूर्ण वर्षभरात ७२ वेळेस श्राध्द करण्यास सांगीतलेले आहे.

**अमावास्या व्दादशैव क्षयाहव्दितये। षोडषापरपक्षस्य अष्टकान्वष्टाकाश्चषट।।**

**संक्रान्त्यो व्दादश तथा अयने व्देच कीर्तिते। चतुर्दशच मन्वादेर्युगादेश्च चतुष्टयम।।**

**न सन्ति पितरश्र्चेति कृत्वा मनसी यो नर:। श्राध्दं न कुरूते तत्र तस्य रक्तं पिबंती ते।।**(*आदित्य पुराण*)

अर्थात पितरांचे श्राध्द न चुकता प्रतीसाली करावे,तसे श्राध्द न केल्यामुळे ते पितर आपल्याच वंशजांचे रक्त शोषण करीत असतात असे,आदित्य पुराणातील वरील श्लोकातुन प्रतित होत आहे.त्रिपिंडी श्राध्द केल्यामुळे श्राध्द न करण्यापासुन निर्माण झालेल्या पूर्वदोषांचा परिहार होत असतो. भुतबाधा, प्रेतबाधा, गंधर्व, राक्षस, शाकिणी,आदिंच्या पिडांच्या परिहारासाठी त्रिपिंडी श्राध्द करतात.घरात कलह,अशांती,सारखे वारंवार उद्‌भवणारे आजारपण, अपयश, अकालीमृत्यु, कामनापूर्ति न होणे, लग्नकार्यात अगोदर व नंतर विविध अनपेक्षीत येणारे अडथळे या सर्व दोषांच्या निवारणा करीता त्रिपिंडी श्राध्द करावेत व तसा श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर.जि.नाशिक येथिलचा परंपरागत स्थानिक प्रघातही आहे.

त्रिपिंडी श्राध्दात ब्रह्मा,विष्णु,रूद्र या तीन देवतांची स्थापनापूर्वक पुजन केले जाते. त्रिपिंडी श्राध्दात सात्विकप्रेत,राजसप्रेत,तामसप्रेत यांचा विशेष विचार केला गेला आहे.सात्विक प्रेतासाठी ब्रम्हाचे पुजन करून भाताचा पिंड दिला जातो तर राजस प्रेतासाठी विष्मुचे पुजन करून जवाचा पिंड दिला जातो तर तामस प्रेतासाठी रूद्राचे पुजन करून तिळाचा पिंड दिला जातो. त्रिपिंडी श्राध्दात ब्रह्मा, विष्णु, रूद्र या तीन देवतांचा संबंध बाल,युव,वृध्द ह्या तीन मानवी अवस्थांशी आहे.ह्या तीनही अवस्थांमध्ये अकाली मृत झालेल्यांपैकी ज्यांचा आत्मा अतृप्त असेल त्यासर्वांच्या मोक्षासाठी केला जाणारा विधी आहे तो त्रिपिंडी श्राध्द.

त्रिपिंडी श्राध्दात कोणत्याही पितरांच्या नावाचा वा गोत्राचा उच्चार केला जात नाही.कारण नक्की कोण तृप्त आहे व कोण तृप्त नाही वा बाधा नक्की कोणाकडुन आहे हेच शाश्वत माहित नसल्याने असे अतृप्त वा मोक्षाची अपेक्षा करणा-यां आत्म्यांसाठीच त्रिपिंडी श्राध्द विधी करण्याची धर्मशास्त्राची आज्ञा आहे.

**ज्यो**तिष शास्त्राच्या बृहत्पाराशरी ह्या नावाच्या प्राचिन ग्रंथामध्ये अनापत्याबद्दल परिस्थिती कशी असता पितृदोष,सर्पदोष,पिशाश्च्च यापासुन होणारी पीडा याच गोष्टीनींच संभवतात,याचा सुक्ष्म विचार केलेला आहे. म्हणुनच प्रत्येक दोषाबद्दल उदाहरणार्थ काही सार्थ श्लोकांच्या अर्थासहित खाली देऊन त्याच्याच दोषांच्या परिहारार्थच **पितृदोषचा(नारायणबली-नागबली व त्रिपिंडी श्राध्द)** विधी करणे आवश्यकच आहे.

## "सर्पशाप (सर्पदोष)"

*पुत्रस्थाने कुजक्षेत्रे पुत्रे राहूसमन्विते। सौम्यदृष्टे युते वापी सर्पशापसुतक्षय:।।*

**(बृहत्पाराशरी श्लोक ११३)**

**कुं**डलीत पंचम स्थान हे सूत स्थान(**संतान स्थान**) आहे. मेष वा वृश्चिक पैकी एका राशी पंचमात असुन तो राहुने युक्त असेल व तो राहु बुधाने दृष्ट असेल तर सर्पशाप आहे,असे जरूर समजावे.

*पुत्रस्था भानुमंदरा: स्वर्भानु: राशीजोऽगिरा। निर्मलौ पुत्रलग्नेशौ सर्पशापसुतक्षय:।।*

**(बृहत्पाराशरी श्लोक ११४)**

**पं**चमस्थानात सूर्य,मंगळ,बुध,गुरू,शनी तसेच राहू यापैकी ग्रह असल्यास आणी पंचमेश तथा लग्नेश हे निर्बली असतील तर हो तो सर्पशापाने सुतक्षय(**संतानक्षय**) जरूर होतो.

*लग्नेशे राहूसंयुक्ते पुत्रेशे भौमसंयुते। कारके राहूसंदृष्टे सर्पशापसुतक्षय:।।*

**(बृहत्पाराशरी श्लोक १५)**

**ल**ग्नाचा स्वामी राहूने युक्त असेल तर वा पंचमस्थानाचा स्वामी मंगळाने युक्त असेल अगर पंचमस्थानाचा

कारक ग्रह राहूने दृष्ट असेल तर खचीतच सर्पशाप आहे,असे जरूर समजावे.

## " ब्रम्हशाप "

**सत्वशील ब्राम्हणाच्या शापाने वंशविच्छेद होतोच.**

*गुरुक्षेत्रे यथा राहू: पुत्रे जीवानभानुजा:। धर्मस्थानाधिपे नाशे ब्रम्हशापात् सुतक्षय:।।*

धनु व मीन यापैकी एका राशीला राहू असुन संततीस्थानात गुरू,मंगळ किंवा शनी यापैकी ग्रह असुन नवमस्थानाचा स्वामी(अधिपती) अष्टमात म्हणजे मृत्यु स्थानात असेल तर तो ब्राम्हणाचा शाप असे समजावे.

## " प्रेत शाप(पिशाच्चदिक शाप)"

*कर्मलोपं पितृभ्यशच तच्छापात् वंसनाशनम्। पुत्रस्थितौ मंदसूर्यौ क्षीणचंद्रस्तु सप्तमे।।*
*लग्ने व्यये राहू जीवौ प्रेत शापात् सुतक्षय:।।*

(बृहत्पाराशरी श्लोक ९६)

पितृकर्माचा अथवा प्रेतकर्माचा कर्मलोप होत असल्यासही वंशाचा नाश होतोच. पंचमस्थानात शनी व सूर्य तसेच सप्तम स्थानात क्षीण चंद्र असेल तर त्याचप्रमाणे प्रथम(लग्न) स्थानात राहू असेल तर किंवा व्ययात (**बारवे स्थान**)गुरू असेल तर प्रेतशापाने संततीच्या नाशाची संभावना जास्त आहे.

## " पितृशाप "

*पितृस्थानाधिपौ भौम: पुत्रेशेन समन्वित:। लग्ने पुत्रे पितृस्थाने पापात् संततिविनाशनम्।।*

(बृहत्पाराशरी श्लोक २४)

पितृस्थानाचा (दशमस्थान)स्वामी मंगळ हा पंचमस्थानाच्या अधिपतीने युक्त असुन प्रथमात, पंचमात, अगर दशमात असेल तर पितृशापने संततीचा नाश होतो.

*लग्नादष्टमगौ भानौ पुत्रस्थे भानुनंदने। पुत्रेशे राहूसंयुक्ते लग्ने पापे सुतक्षय:।।*

(बृहत्पाराशरी श्लोक २७)

लग्नापासुन अष्टमस्थानात सूर्य त्याचप्रमाणे लग्नापासुन पंचमस्थानात शनी असेल तर तथा पंचमेश राहू लग्नात युक्त असेल तर नक्कीच वंशविच्छेद होतोच.

## "अनापत्यत्व योग "

*पुत्रवित्तकलत्रशा संयुक्ता नवभागपा। पापांशका पापयुता अनपत्यत्वमादिशेत्।।*

(बृहत्पाराशरी श्लोक १२४)

पंचम(सुत),धन(वित्त),सप्तम(कलत्र) यांचे सर्वांचेच स्वामी नवमांशाने एकत्र येऊन पापग्रहांच्या अंशात असतील तर वा पापग्रहांनी युक्त असतील तर अनापत्यत्व योग आहे असे मानावे.

साधारण ज्योतिष शास्त्राचा असा ही नियम आहे की,दशमस्थानाचा अथवा पंचमस्थानाचा स्वामी हे निर्बली असतील तसेच तसेच राहू,मंगळ असल्या पापग्रहांनी युक्त असतील तर क्रमाने पितृशाप, प्रेतशाप तथा सर्पशाप संभावतो.

## "कृष्णमूर्ती सिध्दांतां नुसार कुंडलीत पितृदोष"

कृष्णमूर्ती ज्योतिष सिध्दांतानुसार नेमकी बाधित कुंडली कोणती आहे,याचा शोध घेणे अत्यंत महत्वाचे आहे,त्या करीता खालिल नियमाने पितृदोष जन्मकुंडली पहावे.

१) प्रश्नवेळी जन्मकुंडलीत राहू अथवा केतू ची महादशा असावी.
२) कुंडलीत ज्या ग्रहाची महादशा सुरू आहे तो ग्रह राहू अथवा केतू ह्यांच्या नक्षत्रात असावा.
३) प्रश्नवेळी जन्मकुंडलीत ज्या ग्रहांची महादशा असेल त्या ग्रहाच्या युतीत राहु वा केतु असावा.
४) जन्मकुंडलीत चंद्र/राहु वा चंद्र/केतु यांची युती असावी अन्यथा किंवा लग्नेश/राहु वा लग्नेश/केतु यांची युती असावी.

 क्रमश:

**जन्मकुंडलीत वरीलपैकी एखदी स्थिती असेल तर त्याचप्रमाणे पुढिल नियमांची पुर्तता होते का? ते कृपया पहावे.**

१) प्रश्नवेळी राहूचे किंवा केतूचे नक्षत्र असावे.

२) प्रश्नवेळी चंद्र ज्या नक्षत्रात स्थित असेल तो नक्षत्रस्वामी राहू वा केतूच्या का नक्षत्रात असावा.

३) प्रश्नवेळी चंद्र/राहु किंवा चंद्र/केतु अन्यथा सूर्य/राहु या सूर्य/केतु यांची युती असणे जरूरी आहे. किंवा लग्नेश हा राहु या केतुच्या असावा.

**ज्यो**तिष प्रमाण-सर्वसाधारण असे म्हणता येईल की, लग्नेश किंवा पंचमेश यांचे स्वामी ६ / ८ / १२ ह्या त्रिकस्थानात असुन वा पापग्रह यांनी युक्त असतील तर त्यास्थानांची शुभफळे मिळत नाहीत.

*पूजां रूद्रस्य कुर्वीत तद्‌गणांनाच नित्यश:।।* (सु.उ.अ ६१)

**अ**से ही म्हटले गेले आहे की,श्रीमहादेवांच्या पैशाचादिक गणंसहित महादेवांचे पुजन करावे,असा उल्लेख आहे. पितृदोष्याच्या विधीतही(**नारायणबली-नागबली व त्रिपिंडी श्राध्द**)श्री.महादेवांच्या एकादश गणांसह पुजन हा प्रामुख्याने विधी आहे. भगवान धन्वतरींनी औषधांचेच सोबत सत्संतती होण्यासाठीही मंत्रादि दिव्य देवतांच्या अनुष्ठानाचे महत्व प्रतिपादिले आहे.

*देवता ब्राम्हणपरा: शौचाचारहिते रता:। महागणान् प्रसूयन्ते विपरीतास्तु निर्गुणान्।।*

**अ**र्थात आयुर्वेद तथा ज्योतिषशास्त्र या सर्वांची वेदप्रणित **नारायणबली-नागबली व त्रिपिंडी श्राध्द** अनुष्ठानासंबंधी पूर्ण एक-वाक्यताच आहे,ही गोष्ट प्रामुख्याने वाचकांच्या जरूर लक्षात येईलच.

**" पितृदोष्याच्या विधीच्या आरंभाची पध्दती सारांश मध्ये आढावा."**

**ना**रायणबली-नागबली व त्रिपिंडी श्राध्द ह्या दोन्ही विधींची सुरूवांती मध्ये केल्या जाणा-या कर्माचा क्रम सर्व प्रथम पापमुक्ततेसाठी तिर्थराज कुशावर्तावर गंगाभेटीने सुरूवात होऊन पिता जीवित नसल्यास क्षौराधिकर्म करून तद्‌नंतर शरीरशुध्दिअंगभूत देहशुध्दि व प्रायश्चितांगाभूत संकल्प विधी करून शुध्द स्नान करून नविन कोरे वस्त्र परिधान करून त्यानंतर आशुतोष राजाधिराज त्र्यंबकराजाचे कलश दर्शन घेऊन विधीच्या संपूर्ण फलप्राप्तिसाठी प्रार्थना केली जाते.पितृशाप मुक्ततेसाठी नारायणबलीचा प्रधान संकल्प केला जातो.तद्‌नंतर शरीर शुध्दार्थ न्यास, सूर्य-पुजन, दीप-पुजन, भूमि-पुजन, वरूण-पुजन, विष्णु-पुजन, विष्णुतर्पण, पंचदेवतांची(ब्रम्हा, विष्णु, रूद्र, यम, प्रेत (तत्पुरूष))स्थापनादि संपूर्ण पुजन,अग्निस्थापन पूर्वक पुरूषसुक्त हवन,एकादश विष्णुश्राध्द,पंचदेवता श्राध्द, बलिप्रदान, पालाशविधी (पुत्तल विधी), दशांत कर्म, आदि कर्म करून नारायणबलीच्या प्रथम दिवसाच्या (पूर्वाधात)कर्माची दिवशी केले जाते. ह्या पहिल्या दिवशी विधीस बसणा-यांस एक दिवसाचे अशौच(सुतक) पाळावे लागते.(उत्तरार्धात) म्हणजे दुस-या दिवशी एकोदिष्ट श्राध्द, मासिक निवृत्ती श्राध्द, सपिंडी श्राध्द केले जाते, म्हणजे **नारायणबली** विधीची येथे समाप्ती होते.

लगेच नागबली विधीत प्रथम **नागबलीचा** संकल्प, प्राणप्रतिष्ठा पूर्वक नागाची पुजा व बलीप्रदान करून नाग दहनादि कर्म केले जाते. ह्यातही दुस-या दिवशीही विधीस बसणा-यांस एक दिवसाचे परत अशौच(**सुतक**) पाळावे लागते. तिस-या म्हणजे शेवटच्या दिवशी त्रिपिंडी श्राध्द नामक काम्यश्राध्द कुशावर्त तीर्थावरच केले जाते.

**त्या**नंतर रोजचे नित्य-नियमीत घरचे वापरते वस्त्र परिधान करून गुरूजींच्या घरीच **नारायणबली-नागबली व त्रिपिंडी श्राध्द** ह्या दोन्ही विधींच्या अशुभता निरसनार्थां व शुभ फळ प्राप्ती हेतु श्री.गणपती पुजन व स्वस्ति-पुण्याहवाचन केले जाते. सुवासिनी(गुरूजींच्या पत्नीच्या मार्फत) मार्फत औक्षण करवुन नंतर सुवर्ण नाग प्रतिमेचे पुजन करवुन गुरूजीच्या आशिर्वाद वचनाने येथे संपूर्ण पितृदोष्याच्या विधीच्या कर्माची समाप्ती होत असते.

********************************************************************